MHBI120014572022

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३५१/२०२२ मधील नि.क्र. १३ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला असुन दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, दाव्यामध्ये प्रतिवादी क्रमांक ८ यांचे आडनाव पवार असे नमुद करण्यात आले आहे. वास्तविक प्रतिवादी क्रं.८ यांचे आडनाव पवार नसुन गव्हाणे असे आहे. परंतु टंकलेखनातील दोषामुळे प्रतिवादी क्रं. ८ यांचे नांव गव्हाणे ऐवजी पवार असे लिहिण्यात आले आहे. सबब प्रतिवादी क्रं.८ यांच्या नावा मध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी. तसे केल्याने दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. सदर अर्जाच्या पुष्ठर्थ वादी यांनी निशाणी क्र. १४ अन्वये शपथपत्र सादर केले आहे.

३. सदर प्रकरणात प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

४. अर्ज, अर्जदार यांचे शपथपत्र व अभिलेखावरील कागदपत्र यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी कं.८ यांचे आडनाव लिहिण्यात झालेली चुक दुरूस्ती होवून मिळण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं.८ हिचे लग्नापुर्वी आडनांव पवार असे असल्याने दाव्यामध्ये त्यांच्या नावात चुक झाली असल्याचे दिसुन येत आहे. परंतु प्रतिवादी क्रं.८ यांचे लग्नानंतरचे आडनाव गव्हाणे असे असल्याने त्याबाबतची दुरूस्ती करण्याची परवानगी देणे योग्य होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र. १३ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्ज कलम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं.८ यांच्या आडनावा बाबत दुरूस्ती करावी.

३. दाव्यातील प्रस्तावित दुरुस्ती वादी यांनी पुढील तारखेस अथवा त्यापूर्वी करावी. वादी यांनी दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2023.08.17 17:49:34 +0530

स्थळ–धारुर (रा.व.कदम)

दिनांक १७.०८.२०२३ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

धारुर

## प्रमाणपत्र

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | दिवाणी न्यायालय<br>क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | **१७**.०८.२०२३ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | **१७**.०८.२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | **१७**.०८.२०२३ |

सही/–
(**ए.एस.गंगणे** )
लघुलेखक ग्रेड–३
दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर